महाराष्ट्र शासन

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

https://admission.dvet.gov.in ; www.dvet.gov.in ; itiadmission@dvet.gov.in

# शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ऑगस्ट २०२६ सत्रासाठी प्रवेश सूचना

## प्रवेश संकेतस्थळ: https://admission.dvet.gov.in

**(प्रवेश सूचना क्र. २०२६/०५, दि.३१.०७.२०२६)**

राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेतंर्गत (Craftsman Training Scheme) ऑगस्ट २०२६ सत्रातील प्रवेश हे केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया (Centralized Online Admission Process) पध्दतीने करण्यांत येत असून प्रवेशाची सविस्तर “माहितीपुस्तिका - प्रवेश पध्दती, नियमावली व प्रमाणित कार्यपध्दती” दि.२१ मे, २०२६ पासून प्रवेश संकेत स्थळावर Download Section मध्ये Pdf स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या सर्व उमेदवारांना प्रवेश प्रक्रीयेबाबत मार्गदर्शन करण्यासाठी प्रत्येक शासकीय व खाजगी औ.प्र. संस्थांमध्ये दि.२१ मे, २०२६ पासुन रोज सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत नि:शुल्क मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले आहे. सदर सुविधेचा सर्व उमेदवारांनी लाभ घ्यावा. प्रवेश पध्दती, नियमावली, प्रवेश संकेतस्थळाबाबत तांत्रिक व तद्नुषंगिक शंका असल्यास नजिकच्या शासकीय वा खाजगी औ.प्र. संस्थेस संपर्क साधावा अथवा संबंधीत जिल्हा/ प्रादेशिक कार्यालयाच्या मदत कक्षास प्रवेश संकेतस्थळावर देण्यात आलेल्या दुरध्वनी क्रमांकावर सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत संपर्क साधावा. सदर मदत कक्षास संपर्क साधण्यापूर्वी माहितीपुस्तिका अभ्यासावी.

**-: अर्ज करण्याची पध्दत :-**

१. राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था प्रवेश प्रक्रीयेत सहभागी असून सर्व संस्था हे प्रवेश अर्ज स्विकृती केंद्र असतील. अर्ज स्विकृती केंद्रात उमेदवार ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे / पडताळणी / स्विकृती आणि निश्चिती करु शकतील.

२. उमेदवारांनी व पालकांनी माहिती पुस्तिकेत देण्यात आलेली माहिती, प्रवेश पध्दती व नियमांचा अभ्यास करुनच ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर करावा.

३. अर्ज कोणत्याही ऑनलाईन माध्यमातुन भरता येईल. सर्व औ.प्र.संस्थांमध्ये प्रवेश अर्ज व विकल्प भरण्याची सुविधा उपलब्ध आहे.

४. प्रवेश अर्जात अचूक माहिती भरल्यानंतर ऑनलाईन पेमेंट गेटवेच्या माध्यमातुन प्रवेश अर्ज शुल्क जमा करावे.

५. **प्रवेशअर्ज शुल्क:**

   ५.१ राखीव प्रवर्ग (Reserved Category): रु.१००

   ५.२ अराखीव प्रवर्ग (Unreserved Category): रु.१५०

   ५.३ महाराष्ट्र राज्याबाहेरील उमेदवार (Outside Maharashtra State): रु.३००

   ५.४ अनिवासी भारतीय उमेदवार (Non Residential Indian): रु.५००

६. प्रवेश अर्ज निश्चित करण्यासाठी (Application Confirmation) व प्रवेश निश्चित (Admission Confirmation) करण्यासाठी आवश्यक दस्तऐवज/ कागदपत्रांची यादी प्रवेश अर्जात तसेच, संकेतस्थळावर Download या मथळ्याखाली व माहिती पुस्तिकेत (प्रपत्र-३) मध्ये उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

७. **प्रवेश अर्ज निश्चित करणे (Application Confirmation):**

   ७.१. प्रवेश अर्ज निश्चित करण्यासाठी उमेदवाराने प्रवेश अर्जातील माहिती/ दाव्यांच्या पृष्ठ्यर्थ आवश्यक मुळ दस्तऐवज/ कागदपत्रे, कागदपत्रांच्या छायांकीत प्रतींचा (Photocopy) एक संच नजिकच्या औ.प्र. संस्थेत पडताळणीसाठी सादर करावेत.

   ७.२. अर्ज स्विकृती केंद्रामधील अधिकारी हे उमेदवाराने अर्जात नमुद केलेल्या माहितीची उमेदवाराने सादर केलेल्या मूळ दस्ताऐवजावरुन काळजीपूर्वक तपासणी करतील. आवश्यक असल्यास उमेदवारास त्यांनी भरलेली माहिती सादर केलेल्या दस्तऐवज/ कागदपत्रांप्रमाणे दुरुस्त करण्याचे निर्देश देतील. तपासणीनंतर अर्जाचे निश्चितीकरण करुन उमेदवारास “अर्ज निश्चितीकरण पावती” (Application Confirmation Slip) व निश्चित केलेल्या प्रवेश अर्जाची (Confirmed Application Form) प्रत देतील.

   ७.३. उमेदवारास प्रवेश अर्ज निश्चित करण्यासाठी औ.प्र. संस्थेस कोणतेही शुल्क देय नाही.

   ७.४. अर्ज स्विकृती केंद्रामधील अधिकारी अर्ज पडताळणी व प्रवेश अर्ज निश्चित केल्यावर उमेदवारास सर्व मुळ दस्तऐवज/ कागदपत्रे परत करतील. प्रवेश अर्ज निश्चित केल्यानंतर औ.प्र. संस्था मुळ दस्तऐवज/ कागदपत्रे परत करीत नसल्यास अथवा प्रवेश निश्चित करण्यासाठी शुल्क आकारत असल्यास उमेदवाराने त्वरीत मदत कक्षास संपर्क साधावा.

८. निश्चित केलेल्या प्रवेश अर्जांचाच (Confirmed Application) सर्व प्रवेश फेऱ्यांकरिता विचार करण्यात येईल. निश्चित न केलेले अर्ज प्राप्तच झाले नाहीत असे समजण्यात येईल

९. प्रवेश अर्ज निश्चित केल्यावर उमेदवारास प्रवेश अर्जातिल माहितीत बदल करता येणार नाही. तथापि, उमेदवारास प्रवेश अर्जात सादर केलेल्या काही निवडक माहितीत कोणत्याही प्रकारे बदल करावयाचा असल्यास त्यासाठी प्राथमिक गुणवत्ता फेरी नंतर “हरकती नोंदविणे” या फेरीत आपल्या प्रवेश खात्यात प्रवेश (Login) करुन तसा बदल करता येईल. तद्नंतर प्रवेश अर्जात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही.

१०. प्रवेश अर्ज निश्चित केल्यावर पहिल्या प्रवेश फेरीसाठी व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करण्यासाठी प्रवेश संकेतस्थळावर नोंदणी क्रमांक (Registration Number) व पासवर्ड (Password) व्दारे प्रवेश (Login) करुन “Option Form” व्दारे सादर करावेत.

११. उमेदवाराने एकच अर्ज भरावा. एकापेक्षा जास्त अर्ज भरल्यास त्या उमेदवाराचे सर्व अर्ज रद्द होतील. अशा उमेदवाराची निवड झाल्यास वा चूकीने प्रवेश देण्यात आला असल्यास त्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल व उमेदवार संपूर्ण प्रवेश प्रक्रीयेतुन बाद होईल.

१२. अनिवासी भारतीय व इतर राज्यातील रहिवासी असलेल्या उमेदवारांनी देखिल दि.२१ मे, २०२६ पासूनच ऑनलाईन प्रवेश अर्ज व दिलेल्या वेळापत्रका प्रमाणे चौथ्या प्रवेश फेरीसाठी व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करणे आवश्यक आहे.

१३. प्रत्येक प्रवेश फेरीत निवड झालेल्या उमेदवारांना निवडपत्र (Allotment Letter) त्यांच्या प्रवेश खात्यात (Admission Account) उपलब्ध करुन देण्यात येईल. उमेदवारांनी निवड झालेल्या औ.प्र.संस्थेत प्रवेशासाठी दिलेल्या वेळापत्रकानुसार उपस्थित रहावे.

१४. उमेदवाराने त्यास बहाल करण्यात आलेल्या जागेवर प्रवेश निश्चित करतांना प्रवेश अर्जातिल दाव्यांच्या पृष्ठ्यर्थ आवश्यक दस्तऐवज/ कागदपत्रे संबंधीत संस्थेत तपासणीसाठी सादर करावेत. प्रवेश निश्चितीच्या वेळी आवश्यक दस्तऐवज/ कागदपत्रे सादर करु न शकल्यास व/वा माहितीत तफावत आढळल्यास उमेदवारांना बहाल करण्यात आलेली जागा रद्द करण्यात येईल व उमेदवाराला पुढील प्रवेश फेऱ्यांतुन बाद करण्यात येईल.

### -: प्रवेशाचे वेळापत्रक :-

| अ.क्र. | प्रवेश प्रक्रीयेचा तपशील | प्रारंभ दिनांक | अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| **१.०** | **ऑन लाईन प्रवेश अर्ज करणे** | | |
| १.१ | ऑन लाईन पध्दतीने प्रवेश अर्ज भरणे, अर्जात दुरुस्ती (Edit) करणे व प्रवेश अर्ज शुल्क जमा करणे. | २१ मे, २०२६ स.११:०० वाजेपासून | २१ जून, २०२६ सायं.५:०० वाजेपर्यंत |
| **२.०** | **प्रवेश अर्ज निश्चित करणे** | | |
| २.१ | अर्ज स्विकृती केंद्रात (राज्यातील शासकीय वा खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत) मूळ कागदपत्रांच्या तपासणीनंतर प्रवेश अर्ज निश्चित (Confirmation) करणे. | २१ मे, २०२६ स.११:०० वाजेपासून | २२ जून, २०२६ सायं.५:०० वाजेपर्यंत |
| **३.०** | **पहिल्या प्रवेश फेरीसाठी व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करणे** | | |
| ३.१ | प्रवेश अर्ज शुल्क भरल्यावर पहिल्या प्रवेश फेरीसाठी व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करण्यासाठी प्रवेश संकेतस्थळावर नोंदणी क्रमांक (Registration No.) व पासवर्ड (Password) व्दारे प्रवेश (Login) करुन सादर करणे. | १ जून, २०२६ स.११:०० वाजेपासून | २३ जून, २०२६ सायं.५:०० वाजेपर्यंत |
| **४.०** | **प्राथमिक गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे** | | |
| ४.१ | प्राथमिक गुणवत्ता यादी (Provisional Merit List) संकेतस्थळावर प्रसिध्द करणे व उमेदवारांना SMS व्दारे कळविणे. | २५ जून, २०२६, सायं.५:०० वाजता | |
| **५.०** | **गुणवत्ता यादी बाबत हरकती नोंदविणे व प्रवेश अर्जातील माहितीत बदल करणे** | | |
| ५.१ | निश्चित केलेल्या प्रवेश अर्जातील (Confirmed Application Form) माहितीत बदल करावयाचा असल्यास कोणत्याही औ.प्र.संस्थेस भेट द्यावी. औ.प्र.संस्था अर्ज निश्चिती रद्द (Cancel Confirmed Application) करेल. त्यानंतर उमेदवाराने प्रवेश अर्ज अनलॉक करुन माहिती अद्यावत करावी व अर्ज लॉक करावा. संबंधीत औ.प्र.संस्थेत अर्ज पुनच्छ निश्चित (Re-Confirm) करावा.<br>उमेदवाराने बदल केलेल्या माहिती नुसार त्यांनी सादर केलेल्या विकल्पात (Option) बदल संभवतो. अशा उमेदवारांनी विकल्प अर्ज (Option Form) पुनच्छ तपासावा. | २६ जून, २०२६ स.११:०० वाजेपासून | २७ जून, २०२६ सायं.५:०० वाजेपर्यंत |
| **६.०** | **अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे** | | |
| ६.१ | अंतिम गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करणे व उमेदवारांना SMS व्दारे कळविणे. | २८ जून, २०२६, सायं.५:०० वाजता | |
| **७.०** | **पहिली प्रवेश फेरी** | | |
| ७.१ | पहिल्या प्रवेश फेरीसाठी संस्था व व्यवसायनिहाय निवडयादी संकेतस्थळावर प्रसिध्द करणे व उमेदवारांना SMS व्दारे कळविणे | ०२ जुलै, २०२६, सायं.५.०० वाजता | |
| ७.२ | पहिल्या प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या संस्थेत उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी उपस्थित राहुन प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करणे.<br>उमेदवाराने सादर केलेल्या पसंतीक्रमाच्या पहिल्या विकल्पानुसार जागा मिळाल्यास उमेदवाराला प्रवेश निश्चित करावा लागेल. अशा उमेदवाराने प्रवेश निश्चित केला अथवा केला नाही, तरीही त्यास केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या ते चौथ्या प्रवेश फेऱ्यांमध्ये सहभागी होता येणार नाही. ज्या उमेदवारांना विकल्प क्र.०२ ते १०० मधुन जागा वाटप झाली आहे, त्यांची इच्छा असेल तर ते प्रवेश निश्चित करु शकतात, पण असे प्रवेश निश्चित केलेले उमेदवार केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या दुसऱ्या ते चौथ्या प्रवेश फेऱ्यांमध्ये सहभागी होवू शकणार नाहीत. | ०३ जुलै, २०२६ स.९.०० वाजेपासून | ०७ जुलै,२०२६ सायं.५.०० वाजेपर्यंत |
| **८.०** | **दुसरी प्रवेश फेरी** | | |
| ८.१ | दुसऱ्या प्रवेश फेरीसाठी Online पध्दतीने व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करणे. उमेदवाराने नव्याने विकल्प सादर न केल्यास उमेदवाराने पूर्वीच्या प्रवेश फेरीमध्ये सादर केलेले जुनेच विकल्प या प्रवेश फेरीमध्ये विचारात घेण्यात येतील. | ०३ जुलै, २०२६ स.९:०० वाजेपासून | ०७ जुलै,२०२६ सायं.५:०० वाजेपर्यंत |

| अ.क्र. | प्रवेश प्रक्रीयेचा तपशील | प्रारंभ दिनांक | अंतिम दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| ८.२ | दुसऱ्या प्रवेश फेरीसाठी संस्था व व्यवसायनिहाय निवडयादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे उमेदवारांना SMS व्दारे कळविणे. | १२ जुलै, २०२६, सायं.५:०० वाजता | |
| ८.३ | दुसऱ्या प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या संस्थेत उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी उपस्थित राहुन प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करणे.<br>उमेदवाराने सादर केलेल्या पसंतीक्रमाच्या पहिल्या तीन विकल्पांपैकी कोणत्याही एका विकल्पानुसार जागा मिळाल्यास प्रवेश निश्चित करावा लागेल. अशा उमेदवाराने प्रवेश निश्चित केला अथवा केला नाही तरीही त्यास केंद्रिय प्रवेश प्रक्रियेच्या तिसऱ्या व चौथ्या प्रवेश फेऱ्यांमध्ये सहभागी होता येणार नाही. ज्या उमेदवारांना विकल्प क्र.०४ ते १०० मधुन जागा वाटप झाली आहे, त्यांची इच्छा असेल तर ते प्रवेश निश्चित करु शकतात, पण असे प्रवेश निश्चित केलेले उमेदवार केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या तिसऱ्या व चौथ्या प्रवेश फेऱ्यांमध्ये सहभागी होवू शकणार नाहीत. | १३ जुलै, २०२६ स.९:०० वाजेपासून | १६ जुलै,२०२६ सायं.५:०० वाजेपर्यंत |
| **९.०** | **तिसरी प्रवेश फेरी** | | |
| ९.१ | तिसऱ्या प्रवेश फेरीसाठी Online पध्दतीने व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करणे. उमेदवाराने नव्याने विकल्प सादर न केल्यास उमेदवाराने पूर्वीच्या प्रवेश फेरीमध्ये सादर केलेले जुनेच विकल्प या प्रवेश फेरीमध्ये विचारात घेण्यांत येतील. | १३ जुलै, २०२६ स.९:०० वाजेपासून | १६ जुलै,२०२६ सायं.५:०० वाजेपर्यंत |
| ९.२ | तिसऱ्या प्रवेश फेरीसाठी संस्था व व्यवसायनिहाय निवडयादी संकेतस्थळावर प्रसिध्द करणे व उमेदवारांना SMS व्दारे कळविणे. | २१ जुलै, २०२६, सायं.५:०० वाजता | |
| ९.३ | तिसऱ्या प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या संस्थेत उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी उपस्थित राहून प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करणे.<br>उमेदवाराने सादर केलेल्या पसंतीक्रमांकाच्या पहिल्या पाच विकल्पांपैकी कोणत्याही एका विकल्पानुसार जागा मिळाल्यास प्रवेश निश्चित करावा लागेल. अशा उमेदवाराने प्रवेश निश्चित केला अथवा केला नाही तरीही त्यास केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या चौथ्या प्रवेश फेरीमध्ये सहभागी होता येणार नाही. ज्या उमेदवारांना विकल्प क्र.०६ ते १०० मधुन जागा वाटप झाली आहे, त्यांची इच्छा असेल तर ते प्रवेश निश्चित करु शकतात, पण असे प्रवेश निश्चित केलेले उमेदवार केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेच्या चौथ्या प्रवेश फेरीमध्ये सहभागी होवू शकणार नाहीत. | २२ जुलै, २०२६ स.९:०० वाजेपासून | २५ जुलै,२०२६ सायं.५:०० वाजेपर्यंत |
| **१०.०** | **चौथी प्रवेश फेरी** | | |
| १०.१ | चौथ्या प्रवेश फेरीसाठी Online पद्धतीने व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करणे. उमेदवाराने नव्याने विकल्प सादर न केल्यास उमेदवाराने पूर्वीच्या प्रवेश फेरीमध्ये सादर केलेले जुनेच विकल्प या प्रवेश फेरीमध्ये विचारात घेण्यांत येतील. | २२ जुलै, २०२६ स.९:०० वाजेपासून | २५ जुलै,२०२६ सायं.५:०० वाजेपर्यंत |
| १०.२ | चौथ्या प्रवेश फेरीसाठी संस्था व व्यवसायनिहाय निवडयादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे व उमेदवारांना SMS व्दारे कळविणे | ३० जुलै, २०२६, सायं.५:०० वाजता | |
| १०.३ | चौथ्या प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या संस्थेत उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी उपस्थित राहून प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करणे.<br>उमेदवाराने सादर केलेल्या पसंतीक्रमाच्या कुठल्याही एका विकल्पानुसार जागा मिळाल्यास त्यास प्रवेश निश्चित करावा लागेल. | ३१ जुलै, २०२६ स.९:०० वाजेपासून | ०५ ऑगस्ट,२०२६ सायं.५:०० वाजेपर्यंत |
| **११.०** | **नव्याने ऑन लाईन प्रवेश अर्ज करणे व प्रवेश अर्ज निश्चित करणे** | | |
| ११.१ | विहीत मुदतीत प्रवेश अर्ज सादर करू न शकलेल्या उमेदवारांना समुपदेशन प्रवेश फेरीत संधी उपलब्ध करुन देण्यासाठी ऑन लाईन पध्दतीने प्रवेश अर्ज भरणे, अर्जात दुरुस्ती (Edit) करणे, प्रवेश अर्ज शुल्क भरणे व प्रवेश अर्ज निश्चित करणे. | ०३ जुलै, २०२६ स.९:०० वाजेपासून | ०७ ऑगस्ट,२०२६ सायं.५:०० वाजेपर्यंत |
| **१२.०** | **संस्थास्तरीय समुपदेशन फेरी क्र. ०१** | | |
| १२.१ | **सर्व नोंदणी केलेले अप्रवेशीत उमेदवार संस्थास्तरीय समुपदेशन फेरीकरिता पात्र आहेत.**<br>अशा उमेदवारांनी प्रवेश अर्जात सादर केलेल्या माहितीत बदल करावयाचा असल्यास “हरकती नोंदविणे” कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करावी. तद्नंतर प्रवेश अर्जात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही. | ०६ ऑगस्ट, २०२६ स.९:०० वाजेपासून | ०७ ऑगस्ट,२०२६ सायं.५:०० वाजेपर्यंत |
| १२.२ | समुपदेशन फेरीसाठी पात्र उमेदवार व नव्याने अर्ज भरलेल्या उमेदवारांची समुपदेशन फेरीसाठी एकत्रित गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे व उमेदवारांना SMS व्दारे कळविणे. | ०८ ऑगस्ट, २०२६, सायं.५:०० वाजता | |
| १२.३ | नोंदणीकृत तथा अप्रवेशीत उमेदवारांनी औ.प्र संस्थानिहाय व व्यवसाय निहाय रिक्त जागांचा अभ्यासकरूण संस्थास्तरीय समुपदेशन प्रवेश फेरीसाठी आपल्या प्रवेश खात्यात प्रवेश (Login) | ०९ ऑगस्ट, २०२६ स.९:०० वाजेपासून | १० ऑगस्ट, २०२६ सायं.५:०० वाजेपर्यंत |

| अ.क्र. | प्रवेश प्रक्रीयेचा तपशील | प्रारंभ दिनांक | अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| | करुन शासकीय व/वा खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत समुपदेशन फेरीकरिता नोंदणी करणे. | | |
| १२.४ | संगणक प्रणालीव्दारे संस्थास्तरीय समुपदेशन फेरीसाठी संस्थानिहाय गुणवत्ता यादी प्रकाशित करणे, समुपदेशन फेरीसाठी वेळ व दिनांक बहाल करणे व याबाबत उमेदवारास त्यांच्या प्रवेश खात्यात माहिती उपलब्ध करुन देणे. | ११ ऑगस्ट, २०२६ स.११:०० वाजेपर्यंत | |
| १२.५ | दिलेल्या वेळ व दिनांकास संबंधीत संस्थेत हजर असलेल्या उमेदवारांना त्यांच्या गुणवत्ता क्रमांकानुसार समुपदेशनाकरिता बोलाविणे व प्रवेशाकरिता उपलब्ध जागा, उमेदवाराची मागणी, उमेदवाराची अर्हता या आधारावर प्रवेशाच्या जागांचे वाटप करणे. | १२ ऑगस्ट, २०२६ स.८:०० वाजेपासून | १३ ऑगस्ट, २०२६ सायं.५:०० वाजेपर्यंत |
| १२.६ | सदर प्रवेशफेरीत जागा बहाल करण्यात आलेल्या उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या संबंधित औ.प्र.संस्थेत दिलेल्या मुदतीत प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करणे. | १२ ऑगस्ट, २०२६ स.८:०० वाजेपासून | १३ ऑगस्ट, २०२६ सायं.५:०० वाजेपर्यंत |
| **१३.०** | **संस्थास्तरीय समुपदेशन फेरी क्र. ०२ ते ०७** | | |
| १३.१ | प्रवेशोच्छुक व नोंदणीकृत उमेदवारांनी संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत व्यक्तीशः हजर राहुन संस्थेच्या Login व्दारे समुपदेशन फेरीकरीता हजेरी नोंदवावी. | १७ ते २२ ऑगस्ट, २०२६ दररोज स.८:०० वाजेपासून ते दु.११:०० वाजेपर्यंत | |
| १३.२ | हजेरी नोंदविलेल्या उमेदवारांमधून संबंधित संस्थास्तरावर गुणवत्ता यादी तयार करुन प्रकाशित करण्यात येईल. | १७ ते २२ ऑगस्ट, २०२६ दररोज दु.१२:०० वाजता | |
| १३.३ | संस्थास्तरावर तयार केलेल्या गुणवत्ता यादी नुसार उमेदवारांना समुपदेशनाकरिता बोलाविण्यात येईल. प्रवेशाकरिता उपलब्ध जागा, उमेदवाराची मागणी, उमेदवाराची अर्हता या आधारावर प्रवेशाच्या जागांचे वाटप करण्यात येईल. | १७ ते २२ ऑगस्ट, २०२६ दररोज दु.०१:०० वाजेपासून ते अंतिम उमेदवारापर्यंत | |
| १३.४ | सदर संस्थास्तरीय समुपदेश प्रवेश फेरीसाठी निवड झालेल्या उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीनंतर संबंधित संस्थेत त्याच दिवशी प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करावी. उमेदवारांनी त्याच दिवशी प्रवेश निश्चित न केल्यास सदर जागा दुसऱ्या दिवशी रिक्त समजुन प्रवेशासाठी खुली करण्यात येईल. | १७ ते २२ ऑगस्ट, २०२६ दररोज दु.०१:०० वाजेपासून ते अंतिम उमेदवारापर्यंत | |
| **१४.०** | **खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील संस्था स्तरावरील प्रवेश** | | |
| १४.१ | खाजगी औ.प्र.संस्थांमध्ये संस्थास्तरावरील जागा (माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. १.४ प्रमाणे) व प्रवेश फेरीनंतर रिक्त राहिलेल्या जागा संबंधित खाजगी औ.प्र. संस्थांना संस्थास्तरावर भरण्यासाठी उपलब्ध होतील. | १३ जुलै, २०२६ स.९:०० वाजेपासून | २२ ऑगस्ट, २०२६ रा.११:५९ वाजेपर्यंत |

**-: महत्वाची सुचना :-**

१. उमेदवाराने त्यांच्या प्रवेश खात्याचा (Admission Account) पासवर्ड (Password) कोणासही देऊ नये व त्यासंबंधी संपूर्ण गोपनीयता पाळावी. Password विसरल्यास तो Reset करण्याची सुविधा प्रवेश संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
२. राज्यातील सर्व शासकीय व मान्यता प्राप्त खाजगी औ.प्र. संस्था व या संस्थेतील संलग्न व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकड्यांची यादी https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे.
३. केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रीयेत सहभागी खाजगी औ.प्र. संस्था व त्यातील व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकड्या कायम विनाअनुदानित तत्वावर शासन मान्यताप्राप्त व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परीषद (NCVT) यांचेशी संलग्न आहेत. या व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकड्यांमधील प्रवेशित व प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांची परीक्षा - अखिल भारतीय व्यवसाय प्रमाणपत्र परीक्षा (AITT) ही शासकीय औ.प्र.संस्थांतील उमेदवारांप्रमाणेच घेण्यात येवून उत्तीर्ण उमेदवारांना राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र (NTC) बहाल करण्यात येते.
४. उमेदवारांनी खाजगी औ.प्र. संस्थांमध्ये संस्थास्तरावरील जागांसाठी प्रवेश घेण्याअगोदर, ते ज्या व्यवसाय अभ्यासक्रमाच्या तुकडीत प्रवेश घेत आहेत ती व्यवसाय अभ्यासक्रमाची तुकडी प्रवेश संकेतस्थळावर उपलब्ध असल्याची खात्री करावी.
५. कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन प्रवेश प्रणाली व्यतिरिक्त व/वा असंलग्नीत व्यवसाय अभ्यासक्रमाच्या तुकडीत प्रवेश घेतलेल्या उमेदवारांचे प्रवेश ग्राह्य धरण्यात येणार नाहीत व अशा उमेदवारांची परीक्षा संचालनालयामार्फत घेण्यात येणार नाही याची सर्व उमेदवार, पालक व औ.प्र. संस्थांनी नोंद घ्यावी.
६. **वरील प्रवेश वेळापत्रक सूचक दर्शक असून त्यात बदल संभवतो. अद्ययावत प्रवेश वेळापत्रक प्रवेश संकेतस्थळावर व सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच नोंदणीकृत उमेदवारांना SMS व्दारे वेळोवेळी कळविण्यात येईल. संपूर्ण प्रवेश प्रक्रिये दरम्यान उमेदवारांनी वेळोवेळी प्रवेश संकेतस्थळास भेट देणे त्यांचे हिताचे राहील.**

-Sd-
(सतिश रु. सुर्यवंशी)
संचालक

स्थळ: मुंबई
दिनांक: ३१ जुलै, २०२६